RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १०६] बुधवार, ऑगस्ट १९, २०२६/श्रावण २८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३५३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## अल्पसंख्यांक विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑगस्ट २०२६.

**अधिसूचना**

**एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण आणि विकास अधिनियम, १९९५.**

क्रमांक वक्फ २०२०/प्र.क्र.९६/कार्यासन-४.—ज्याअर्थी, वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३ वा) च्या कलम ८३ च्या पोटकलम (१) व (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. वक्फ २०१५/प्र.क्र.१४२/कार्यासन-४, दि. १ ऑगस्ट २०१७ (यापूढे " उक्त अधिसूचना " असे संबोधण्यात येईल), अन्वये, एखाद्या वक्फ किंवा वक्फ मालमत्तेशी संबंधित विवाद, प्रश्न व इतर संबंधित बाबींचे निर्धारण करण्यासाठी, एखाद्या भाडेकरुचे निष्कासन किंवा अशा मालमत्ता संदर्भातील भाडेपट्टाकार व भाडेपट्टादार यांच्या अधिकारांचे व बंधनांचे (obligation) निर्धारण उक्त अधिनियमांतर्गत करण्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारिता असलेले, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद (यापुढे " उक्त न्यायाधिकरण " असे संबोधण्यात येईल) ची स्थापना केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग, शासन अधिसूचना क्र. वक्फ-२०२५/प्र.क्र.५१/का-४, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ अन्वये, सदर न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून श्री. अनीस शेख यांची नियुक्ती रद्द केली आहे ;

आणि ज्याअर्थी, एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण आणि विकास अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३) मधील कलम ८३ च्या पोटकलम (४) मधील खंड (ब) नुसार राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या संवर्गातील सदस्याचे पद रिक्त आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनास सदर श्रेणीतील एका व्यक्तीची सदर न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून नियुक्ती करणे आवश्यक व उचित वाटते ;

आता, म्हणून, एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण आणि विकास अधिनियम, १९९५ च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) मधील खंड (ब) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन याद्वारे श्री. अनंत गव्हाणे, सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी, यांची सदर न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती नियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा ते वयाची ६५ वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील.

उक्त अधिसूचनेस जोडलेल्या तक्त्यात अनुक्रमांक १ नंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात येईल, म्हणजेच :-

| | | | |
|---|---|---|---|
| “ २ | श्री. अनंत गव्हाणे | कलम ८३ च्या पोटकलम (४) मधील खंड संवर्गातील राज्य शासनाचा अधिकारी | सदस्य” |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आनंदा शेंडगे,**
शासनाचे उप सचिव.

**MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 19th August 2026.

*NOTIFICATION*

UNIFIED WAQF MANAGEMENT, EMPOWERMENT, EFFICIENCY AND DEVELOPMENT ACT, 1995.

No.Waqf 2020/C.R.96/Desk-4.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*4*) of section 83 of the Waqf Act, 1995 (43 of 1995) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra *vide* Government Notification, Minorities Development Department, No.Waqf-2015/C.R.142/Desk-4, dated the 1st August 2017 (hereinafter referred to as "the said Notification"), has constituted the Maharashtra State Waqf Tribunal at Aurangabad (hereinafter referred to as "the said Tribunal") for the determination of any dispute, question or other matter relating to a waqf or waqf property, eviction of a tenant or determination of rights and obligations of the lessor and the lessee of such property, under the said Act, having jurisdiction over whole of the State of Maharashtra ;

And whereas, Government of Maharashtra has *vide* Government Notification, Minorities Development Department, No. Waqf 2025/C.R.51/Desk-4, dated 9th October 2025 cancelled the appointment of Shri Anees Shaikh as Member of the said Tribunal ;

And whereas, the post of the category of officer of the State Government as per sub-clause (b) of sub-section (*4*) of Section 83 of the Unified Waqf Management, Empowerment, and Development Act, 1995 (43 of 1995), is vacant ;

And whereas, the Government considers it expedient to appoint a person from the said category as member on the said Tribunal ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (b) of sub-section (*4*) of Section 83 of the Unified Waqf Management, Empowerment, and Development Act, 1995, the Government hereby appoints Shri Anant Gavahane, Retired Additional Collector, as a Member of the said Tribunal for a period of five years from the date of appointment or until he attains the age of sixty-five years, whichever is earlier and for that purpose amends the said Notification as follows;

In the Table appended to the said notification, after Serial No. 1, the following entry shall be inserted, namely:—

| | | | |
|---|---|---|---|
| "2 | Shri Anant Gavahane, | Officer under clause (b) of sub-section (4) of section 83 | Member" |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANANDA SHENDGE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.